महाराष्ट्र शासन
# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

८वा मजला, न्यु. एक्सलसियर बिल्डींग, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी : ०२२ - २२०१ ६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ईमेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र. रासाप्रपक/कृशिप्र-१३२४/सूचना क्र. ०७/ कृषी/CAP/१५०३ दिनांक : २८/०८/२०२४

## जाहीर सूचना

**विषयः कृषी पदवी प्रवेश प्रक्रिया २०२४-२५ केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरीचे (CCAP) सुधारीत वेळापत्रक व वाढीव प्रवेश प्रक्रिया केंद्रांबाबत.**

संदर्भः- राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाची जाहीर सूचना क्र. रासाप्रपक/कृशिप्र-१३२४/सूचना क्र.०३/कृषी/CAP/१२५८, दि.२८/७/२०२४

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संदर्भीय जाहीर सूचनेद्वारे केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी दिनांक २ ते ७ सप्टेंबर, २०२४ हया कालावधीमध्ये राबविण्यात येणार असल्याचे नमूद करण्यात आलेले आहे. तथापि, सदर कालावधीमध्ये बैलपोळा आणि गणेशोत्सव असल्याने सदर कालावधीमध्ये बदल करण्याची आणि सदर प्रवेश फेरीसाठीच्या प्रवेश प्रक्रिया केंद्रांमध्ये वाढ करण्याची मागणी करण्यात आलेली आहे.

यास अनुसरून केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी दि. २ ते ७ सप्टेंबर, २०२४ ऐवजी दि. ३०/०८/२०२४ ते ०५/०९/२०२४ (दि.२/९/२०२४- बैलपोळा वगळता) या कालावधीत राबविण्यात येणार आहे. तसेच सदरची प्रवेश फेरी चार प्रवेश प्रक्रिया केंद्रांऐवजी आठ प्रवेश प्रक्रिया केंद्रांवर राबविण्यात येणार आहे, याची प्रवेशोच्छुक उमेदवार आणि इतर सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरीचे सविस्तर वेळापत्रक यासोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये देण्यात आले असून परिशिष्ट-२ मध्ये प्रवेश प्रक्रिया केंद्रे आणि त्याअंतर्गत महाविद्यालयांचा तपशील देण्यात आलेला आहे.

**(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई**

## परिशिष्ट-१

### केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरीचे (CCAP) सुधारीत वेळापत्रक

| कार्यक्रम | सध्याचा दिनांक | सुधारीत दिनांक |
|---|---|---|
| रिक्त जागांकरिता " केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी" | ०२/०९/२०२४ ते ०७/०९/२०२४ | ३०/०८/२०२४ ते ०५/०९/२०२४ |
| अंतिम गुणवत्ता यादीतील पर्सेंटाईल (इतर अधिभारांसह) | | |
| ८५ व त्यापेक्षा अधिक | ०२/०९/२०२४ | ३०/०८/२०२४ |
| ६५ व त्यापेक्षा अधिक | ०३/०९/२०२४ | ३१/०८/२०२४ |
| ५० व त्यापेक्षा अधिक | ०४/०९/२०२४ | ०१/०९/२०२४ |
| ३५ व त्यापेक्षा अधिक | ०५/०९/२०२४ | ०३/०९/२०२४ |
| सर्व पात्र उमेदवार | ०६/०९/२०२४ | ०४/०९/२०२४ |
| सर्व पात्र उमेदवार (जागांच्या रुपांतरासह) | ०७/०९/२०२४ | ०५/०९/२०२४ |

टिप: (१) पदवी प्रवेश माहिती पुस्तिकेतील 'परिशिष्ट- आय' मध्ये नमूद करण्यात आलेल्या कार्यपध्दतीनुसार वरील कालावधीमध्ये केंद्रीभूत केंद्रनिहाय प्रवेश फेरी राबविण्यात येईल.

(२) यापुढील वेळापत्रक म्हणजेच महाविद्यालयस्तरीय प्रवेश फेरी. संस्थास्तरीय कोटयातील जागा भरण्याचे वेळापत्रक यामध्ये कोणताही बदल नसून संदर्भीय जाहीर सूचना दि.२८/७/२०२४ मध्ये नमूद केल्याप्रमाणेच पुढील प्रवेश प्रक्रिया होईल.

## परिशिष्ट -२

केंद्रनिहाय केंद्रीभूत प्रवेश फेरीसाठी सुधारीत प्रवेश प्रक्रिया केंद्र व महाविद्यालयांचा तपशील

| प्रवेश माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केलेली प्रवेश प्रक्रिया केंद्रे | | | सुधारीत प्रस्तावित प्रवेश प्रक्रिया केंद्रे | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रवेश प्रक्रिया केंद्र | प्रवेश प्रक्रिया केंद्रांतर्गत महाविद्यालये | अ. क्र. | प्रवेश प्रक्रिया केंद्र | प्रवेश प्रक्रिया केंद्रांतर्गत महाविद्यालये |
| १. | डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी, जि. अहमदनगर | अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये | १. | डॉ. अण्णासाहेब शिंदे कृषी अभियांत्रिकी व तंत्रज्ञान महाविद्यालय, राहुरी, जि. अहमदनगर | अहमदनगर, नाशिक, धुळे, नंदुरबार व जळगाव हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित महाविद्यालये |
| | | | २. | कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे ४११ ००५ | पुणे, सोलापूर, सातारा, सांगली व कोल्हापूर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये |
| २. | कृषी महाविद्यालय, अकोला ४४४ १०४ | अकोला, अमरावतील, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली व चंद्रपूर हया जिल्हयातील | ३. | कृषी महाविद्यालय, अकोला ४४४ १०४ | अकोला, अमरावतील, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा, हया जिल्हयातील सर्व घटक / अनुदानित / विना अनुदानित महाविद्यालये |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये | ४. | कृषी महाविद्यालय, नागपूर ४४४ ००१ | नागपूर, वर्धा, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, व चंद्रपूर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये |
| ३. | कृषी महाविद्यालय, कृषी नगर, परभणी ४३१ ४०२ | परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशीव, बीड, जालना व छत्रपती संभाजीनगर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये | ५. | कृषी महाविद्यालय, कृषी नगर, परभणी ४३१ ४०२ | परभणी, हिंगोली, नांदेड, हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये |
| | | | ६. | कृषी महाविद्यालय, नांदेड रोड, लातूर ४१३ ५१२ | लातूर, बीड, व धाराशीव हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये |
| | | | ७. | कृषी महाविद्यालय, बदनापूर | जालना व छत्रपती संभाजीनगर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित महाविद्यालये |
| ४. | कृषी महाविद्यालय, दापोली | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये | ८. | कृषी महाविद्यालय, दापोली | रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगड, ठाणे, पालघर हया जिल्हयातील सर्व घटक / विना अनुदानित सर्व महाविद्यालये |

*** *** ***